# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)



**March 2020 Special Issue – 28, Vol. 2**


# Relevance of Mahatma Gandhi in Today's World


Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
***Guide***
**Dr. B. G. Gaikwad**
**Principal**
**Shivaji College, Hingoli (MS)**

**Editor**
**Dr. Balasaheb S. Kshirsagar**
**Director, Gandhian Studies Centre**
**Shivaji College, Hingoli (MS)**

*Co-Editor*
Dr. [illegible]
Dept. of Political Science
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
Dr. [illegible]
Dept. of Sociology
Shivaji College, Hingoli (MS)

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 2 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# महात्मा गांधीजीचे ग्रामस्वराज्य विषयक विचार

**प्रा.के.जे. खंदारे**

लोकप्रशासन विभाग, शिवाजी महाविद्यालय हिंगोली

**प्रस्तावना :-**

मोहनदास करमचंद गांधी ( २ ऑक्टो इ.स .१८६९ ते ३० जाने. इ.स.१९४८) हे भारतच्या स्वातंत्र्य लढयातील अग्रणी नेते होते. महात्मा गांधी या नावाने ते आपल्या सर्वांना परिचीत आहेत. संपुर्ण जग त्याच्याकडे एक महात्मा म्हणून बघते. तर देशातील जनता त्याना राष्ट्रपिता /बापु या नावाने ओळखते. रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांना महात्मा ही पदवी प्रथम बहाल केली. अहिंसात्मक मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळवून देणारे पहिले नेते म्हणून त्याची ख्याती आहे. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स.१९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना ' राष्ट्रपिता' असे संबोधले होते. गांधी हे सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते.त्याचा जन्म दिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन 'म्हणून साजरा केला जातो.गांधीजी हे एक युगपुरुष ,सत्याला परमेश्वर मानणारे , अहिंसा धर्माचे प्रवर्तक, मानवतेचे गाढे पुजारी होते. ते एक श्रेष्ठ तत्वचिंतक, शिक्षणतज्ञ आणि राजकीयतज्ञ होते. सत्य अहिंसा,प्रेम ,करुणा,आत्मबल,अन्यायाविरुध्द चीड,नैतिकता,साधी राहणी व उच्च विचारसरणी असे त्याचे जिवन विषयक तत्व होते. भारत पारतंत्र्यात रखडला असता त्यास स्वतंत्र करण्याचा सर्वप्रथम महात्मागांधीजीनी विडा उचलला.भारतीय जनतेत आत्मविश्वास निर्माण करुन स्वातंत्र्य लढा उभारण्याचे भरीव कार्य त्यांनी केले. ब्रिटीशाना हिंसात्मक विरोध न करता अहिंसात्मक मार्गाने त्याच्या वर्चस्वापासुन भारतला स्वातंत्र मिळवुन देण्याचे महत्वपुर्ण कार्य गांधीजीनी केले आहे. यामुळेच आजही भारतात बालकापासून ते मोठयापर्यंत सर्वच लोकाच्या मनात गांधीजीच्या बाबत सहानुभती व सहिष्णुता आहे. गांधीजीचे विचार अष्टपैलु आहेत , विविधअंगी बहुश्रुत आहेत . सगळेच विचार मांडणी मला काय शक्य नाही म्हणून मी फक्त शैक्षणिक विचार किंवा गांधीजीचे ग्रामस्वराज्य विषयक विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

भारत हा आकाराने खूप विस्तीर्ण आणि प्रचंड लोकसंख्या असलेला वैभवशाली देश आहे यामध्ये जर एकाच ठिकाणाहून शासनकारभार चालविला गेला तर सर्व जनतेच्या अडचणी सोडविणे शक्य होणार नाही. त्यामुळेच भारताने संघराज्यशासन पध्दतीचा अंगीकार केलेला आहेच पण त्याच बरोबर ग्रामपातळीपर्यंत सत्तेची वाटणी केलेली आहे. सर्व सत्ता व अधिकार एका व्यक्तीकडे, व्यक्तीगटाकडे किंवा एकाच यंत्रणाकडे सोपाविलेले नसणे यालाच विकेंद्रीकरण असे म्हणतात. अर्थातच धोरण आखणे, निर्णय घेणे किंवा निर्णयाची अंमलबजावणी करणे या सर्वाविषयीचे अधिकार जेव्हा वेगवेगळ्या यंत्रणाकडे असतात तेव्हा विकेंद्रीकरण झालेले असते. भारतासारख्या लोकशही प्रधान देशात सत्तेची वाटणी केंद्र पातळीवर केंद्रसरकार, राज्य पातळीवर राज्य सरकार, आणि ग्रामिण व जिल्हा पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थानकडे सोपविण्यात आलेली आहे. शासन व प्रशासन यंत्रणाच्या प्रत्येक पातळीवर विभीन्न शासकीय प्रशासकीय यंत्रणाचे कार्य फार महत्वपूर्ण आहे. विविध प्रादेशीक घटकांना त्या त्या प्रादेशांपुरते काही अधिकार देवून सत्तेचे विकेंद्रीकरण करता येते असे विक्रेंद्रीकरण केले असता स्थानिक जनता स्थानिक प्रश्नाकडे जास्त काळजीपुर्वक लक्ष्य देईल तसेच प्रशासकिय सोयीच्या दृष्टीने चांगले राहिल या हेतुनेच पंचायतराज संस्थाची निर्मीती करण्यात आलेली आहे. विकेंद्रीकरण केल्याने एकाच यंत्रणेवर कामाचा जास्त बोजा पडत नाही तसेच वेळेचीही बचत होते. कार्याचे विभाजन झाल्यामुळे कार्यक्षमतेत देखील वाढ होते. महात्मा गांधीजीना सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारीत स्वराज्यांची स्थापना व्हावी असे वाटत असे . विकेंद्रीकरणातुनच जास्तीत जास्त लोकांचा सहभाग साधने शक्य होते. जनतेचे निर्णय सर्व संमतीने, चर्चेने घेतली जातात. विकेंद्रीकरणाच्या (स्थानिक स्वराज्य संस्थाच्या) माध्यमातुन लोकशाही अधिक भक्कम व सक्षम होण्यास मदत होते.

**स्वराज्य :-**

स्थानिक पातळीवरुन सर्व माणसे चालवितात ते "स्वराज्य" होय. जागतील दुसऱ्या कोणाचीही सत्ता आपल्यावर चालु न देणे हे स्वरायाचे एक लक्षण आहे. तर दुसऱ्या कोणावरही आपली सत्ता न चालविणे हे स्वराज्याचे दुसरे लक्षण आहे. आपण कोणावर सत्ता चालवु नये , तसेच कोणाची सत्ता आपल्यावर चालु नये या दोन गोष्टी मिळुन स्वराज्य बनते.

**ग्रामस्वराज्य :-**

महात्मा गांधीनी विकेंद्रीकरणाची व्यवस्था केली . स्थानिक पातळीवर पंचायती स्थापना केल्या पाहिजेत स्थानिक यंत्रणाना अधिकार असणे म्हणजेच स्थानिक/ ग्रामीण स्वराज्य होय. ग्रामस्वराज्य म्हणजे स्वयंपुर्ण किंवा स्वावलंबी गावाचे छोट्या वस्त्याचे संघटन की ज्यांना संपुर्णपणे शासन, प्रशासन चालविण्याचे स्वातंत्र्य असणे होय.

**महात्मागांधी आणि ग्रामस्वराज्य :-**

भारतातील प्रत्येक खेडे स्वंयपुर्ण ,स्वावलंबी असेल. गांधीजीच्या मते, 'भारताचे दर्शन मुठभर शहरांमध्ये नव्हे तर त्यांच्या सात लाख खेड्यांमध्ये घडते.' स्वायत्त असलेल्या खेड्यामध्ये व्यक्ती ही केंद्रस्थानी असेल. ही सर्व खेडी स्वयस्फुर्त सहकार्याच्या बळावर आपल्या गरजा भागवु शकतील. त्यामुळे सर्वांना चांगले, सुखी जिवन जगता येईल .सर्व खेड्यांना स्वतःचे निर्णय घेण्याचे अधिकार असतील सर्व खेड्याचे मिळुन एक राज्य अशा पध्दतीचे संघराज्य तयार होईल.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI